नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६२/२०२२
(रामचंद्र रामचंद्र रामकृष्ण राणे व .८ वि.भरत बाबुराव परब व. )

## :– नि. १३ खालील आदेश –:

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३.सत्यवान पांडुरंग परब हे दिनांक २७/०७/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे वारस प्रतिवादी क्र. ३अ) श्रीम. सविता सत्यवान परब प्रतिवादी क्र. ३ ब) श्री.सदास्मित सत्यवान परब प्रतिवादी क्र.३क)श्री.स्मिता सत्यवान परब हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे दाव्यामध्ये वादी यांच्या वारसांचे नांव दाव्यात सामील करुन तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी ३अ,ब,क यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदर अर्ज प्रतिवादी यांना मान्य नसून तो फेटाळणेत यावा अशी विनंती केलेली आहे. .

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हक्कप्रस्थापना व कायम ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी हे मयत झाल्याने त्याचे वारस म्हणून ३अ) श्रीम. सविता सत्यवान परब प्रतिवादी क्र. ३ ब) श्री.सदास्मित सत्यवान परब प्रतिवादी क्र.३क)श्री.स्मिता सत्यावान परब हे कायदेशीर प्रतिनिधी आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *''दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा*

*अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.''*

**४.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी हे दिनांक २७/०७/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापना व कायमची ताकीदीकरीता दाखल केला असल्याने प्रतिवादी क्र.३ यांचे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल केलेला असत्याने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. १३ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

सही/-

दिनांक- १३/०९/२०२३

(प.रा.ढोरे )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.